03:22:33 PM

फौ.कि.अर्ज क्र.७१/२०१६
कमल वि कचरु
निशाणी २६ लगत

**उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.बी.डी.थोरात यांच्यामार्फत**

२. माझी बहिण अंबडला माझ्याबरोबर राहत होती. आम्हाला कन्नड येवून २० वर्ष झाले. हे खरे आहे की, माझा एक भाचा २० ते २२ वर्षाचा झालेला आहे. हे खरे आहे की, माझ्या भाचीचे लग्न झाले असून तीला २ मुल आहेत. हे खरे आहे की, ती तिच्या सासरी राहते. हे खरे नाही की, माझा भाचा बारामती साखर कारखाना येथे नोकरीला आहे. हे खरे नाही की, त्याला त्याठिकाणी २० ते २५ हजार रुपये पगार आहे. मला हे सांगता येणार नाही की, माझ्या मेव्हण्याला एम.ई.सी.बी.ने काही दिवस कामावरुन कमी केले होते किंवा कसे. मला याची माहिती नाही की, त्यामुळे त्याला बरेच दिवस पगार देखील देण्यात आला नव्हता किंवा कसे. हे खरे नाही की, पगार नसल्यामुळे त्याची परिस्थिती खालावलेली आहे. गैरअर्जदार याने बीडकिन व बाजार सावंगी येथे काम केलेले आहे. मी स्वतः  गैरअर्जदारविरुध्द त्यांच्या कार्यालयात अर्ज दिलेला नाही. हे खरे आहे की, कार्यालय सांगेल त्याठिकाणी जावून काम करावे लागेल. हे खरे आहे की, त्याच्या इच्छेप्रमाणे कामकाज चालत नाही.

३. आम्ही दोघे भाऊ आहोत. आम्ही दोघे एकत्र राहतो. माझी बहिण माझ्यासोबत राहत नाही. माझ्या बहिणीचा मुलगा तिच्यासोबत राहतो. माझी बहिण प्रविण मालकर यांच्या घरी राहते. माझ्या बहिणीकडे दोन खोल्या आहेत. माझ्या म्हणण्याप्रमाणे २ हजार रुपये भाडे आहे असा दाखविणारा कागद मी पाहिलेला नाही. मी बहिणीच्या घरचे लाईटबिल पाहिलेले आहे. साक्षीदार सांगतो की, मी स्वतः काही वेळा पैसे दिलेले आहेत. मी मजूरी करतो. मला मजूरीपासून ३००/- रुपये मिळतात. हे खरे नाही की, माझ्या बहिणीची तब्येत चांगली नाही. माझ्या बहिणीला हेडगेवार रुग्नालयात नेले होते. तिच्या हाताची नस दबली होती. हे खरे नाही की, माझ्या बहिण ठणठणीत असून तिला कोणताही आजार नाही. हे खरे नाही की, ती मजूरीने जावून ५०० रुपये कमवते. हे खरे

नाही की, माझा भाचा कामाला असल्यामुळे माझ्या बहिणीला अर्जदाराकडून आता खावटीची गरज नाही.

४. मी गैरअर्जदार याची पगाराची पावती पाहिलेली नाही. हे खरे आहे की, मला गैरअर्जदार यांचा निश्चित पगार सांगता येणार नाही. हे खरे नाही की, माझ्या बहिणीला ८ ते १० हजार रुपये खर्च येतो असे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, गैरअर्जदार महिन्याला २० हजार रुपये खावटी देवू शकतो असे माझे म्हणणे खोटे आहे. हे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.08.02 18:00:03 +0530

(वि. द. पाटील)

दि.०२/०८/२०२५
03:42:14 PM

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कन्नड

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 02.08.2025 |
| Order signed by the Presiding Officer | 02.08.2025 |
| Order uploaded on | 02.08.2025 |